# बृहन्मुंबई महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

## परिपत्रक

क्र.एमपीआर/2384 दि. 24.05.2023

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील महानगरपालिका मुख्य लेखा परीक्षक, महानगरपालिका चिटणीस व महानगरपालिका आयुक्तांच्या अखत्यारितील सर्व खात्यांतील इच्छुक व प्रस्तुत परिपत्रकातील अनु.क्र. 3 येथे नमूद 'कार्यकारी सहायक' (पूर्वीचे पदनाम 'लिपिक') या पदाची विहित अर्हता धारण करीत असलेल्या निम्नसंवर्गातील पात्र कर्मचा-यांकडून 'कार्यकारी सहायक' या पदाच्या नियुक्तीसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

ज्या कर्मचा-यांची वेतनश्रेणी(असुधारित वेतनश्रेणीनुसार ग्रेडपे) कार्यकारी सहायक (पूर्वीचे पदनाम : लिपिक) पदाच्या वेतनश्रेणीपेक्षा अधिक आहे असे इच्छुक कर्मचारी देखील निम्नसंवर्गातून निवड पध्दतीने कार्यकारी सहायक(पूर्वीचे पदनाम : लिपिक) पदासाठी अर्ज करु शकतील.

निम्नसंवर्गातील कर्मचा-यांमधून निवड पध्दतीने भरावयाच्या 'कार्यकारी सहायक' (पूर्वीचे पदनाम 'लिपिक') पदाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| पदाचे नाव | कार्यकारी सहायक |
| वेतनश्रेणी (सुधारित) | स्तर M13 रु. 21,700 - 69,100 |
| वेतनश्रेणी (असुधारित) | 5200 – 66666 + 2000 श्रेणीवेतन |
| **भरावयाच्या रिक्त पदांची संख्या** | **1178** |

**(1) निम्नसंवर्गातील कर्मचा-यांमधून निवड पध्दतीने कार्यकारी सहायक या संवर्गाची भरावयाची रिक्त पदे**

| तपशील | अजा | अज | विजा(अ) | भज(ब) | भज(क) | भज(ड) | विमाप्र | इमाव | आ.दु.घ. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **भरावयाची एकूण पदे** | **134** | **91** | **43** | **31** | **35** | **16** | **17** | **217** | **118** | **476** | **1178** |

**रिक्त पदांचे प्रवर्गनिहाय सामाजिक व समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे.**

| **समांतर आरक्षण** | अजा | अज | विजा(अ) | भज(ब) | भज(क) | भज(ड) | विमाप्र | इमाव | आ.दु.घ. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | **94** | **64** | **30** | **22** | **24** | **11** | **12** | **152** | **83** | **333** | **825** |
| महिला 30% | **40** | **27** | **13** | **09** | **11** | **05** | **05** | **65** | **35** | **143** | **353** |
| एकूण | **134** | **91** | **43** | **31** | **35** | **16** | **17** | **217** | **118** | **476** | **1178** |

दिव्यांग 4%

महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय क्र.दिव्यांग 2021/प्र.क्र.33/नवि-28 दि. 16.04.2021 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार शासन निर्णयासोबत संलग्नित करण्यात आलेल्या परिशिष्ठ 'अ' मधील तक्त्यात दर्शविल्यानुसार 'क' संवर्गातील अनु.क्र. 11 वरील लिपिक-टंकलेखक या पदासाठी नि:समर्थ उमेदवाराची नियुक्ती करण्यासाठी केलेल्या पदनिश्चितीच्या धर्तीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कार्यकारी सहायक (पूर्वीचे पदनाम : लिपिक) या संवर्गातील नि:समर्थ(दिव्यांग) उमेदवारांची नियुक्ती करण्यासाठी महानगरपालिका सह आयुक्त(सा.प्र.) यांच्या क्र. एमपीआर/5212(245) दि.31.05.2021 अन्वयेच्या मान्यतेनुसार पदनिश्चिती करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने कार्यकारी सहायक (पूर्वीचे पदनाम : लिपिक) संवर्गाकरीता एकूण 47 पदे आरक्षित आहेत. सदर पदे प्रत्येकी

(a) B-Blind (अंध) , LV-Low Vision (अल्पदृष्टी) मधून 10 पदे

(b) D-Deaf (कर्णबधीरता), HH-Hard to Hearing (ऐकू येण्यातील दुर्बलता) मधून 10 पदे

(c) OA-One Arm (एक हात अस्थिव्यंगता), BA-Both Arms (दोन्ही हात अस्थिव्यंगता), OL-One Leg (एक पाय अस्थिव्यंगता), BL-Both leg (दोन्ही पाय अस्थिव्यंगता), OAL-One Arm & One Leg (एक हात आणि एक पाय अस्थिव्यंगता), CP-Cerebral Palsy (मेंदूचा पक्षाघात), LC-Leprosy Cured (कुष्ठरोग मुक्त), DW-Dwarfism (शारीरिक वाढ खुंटणे), AAV-Acid Attack Victims (आम्ल हल्लाग्रस्त), MDY-Muscular Dystrophy (स्नायू विकृती) मधून 09 पदे

(d) ASD(M, MoD)-Autism Spectrum Disorder(M-Mild, MoD-Moderate)(स्वमग्नता - सौम्य, मध्यम), ID-Intellectual Disability (बौध्दिक अपंगत्व), SLD-Specific Learning Disability (विशिष्ठ शिक्षण अक्षमता), MI-Mental illnessपदे (मानसिक आजार) मधून 09 पदे

MD involving (a) to (d) above-Multiple Disabilities involving above a to d (वरील ए ते डी मधील एकाधिक अंपगत्वाचा समावेश) मधून 09 पदे भरण्यात येतील.

- खात्यांतर्गत भरतीसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.
- रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत तसेच सामाजिक व समांतर आरक्षण बदलण्याचे अधिकार किंवा

भरती प्रक्रिया अंशत: किंवा पूर्णत: रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.

- सामाजिक व अन्य समांतर आरक्षणाची पदे भरण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे खात्यांतर्गत भरतीप्रक्रिया राबविली जाईल.

**(2) सामाजिक व समांतर आरक्षण :-**

(1) महिलांसाठी 30% प्रमाणे आरक्षित पदे महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. 81/2001/मसेक्षा 2000/प्र.क्र.415/का.2 दि. 25.05.2001 अन्वयेच्या शासन निर्देशानुसार भरण्यात येतील. तथापि, एखाद्या प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या प्रवर्गाच्या पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

(2) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी 10% प्रमाणे आरक्षित पदे शासन निर्देशानुसार भरण्यात येतील.

(3) वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज.(ड) या प्रवर्गातील कर्मचारी उपलब्ध न झाल्यास, सदर पदे आंतर-परिवर्तनीय म्हणून भरण्यात येतील.

(4) रिक्त पदांची संख्या, आरक्षण/अनुशेष यात बदल होण्याची शक्यता आहे. महिलांसाठी विहित केलेले आरक्षण नियमानुसार अनुज्ञेय असेल.

(5) महिला समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या उमेदवारांकरीता क्र. महिआ2023/प्र.क्र.123/कार्या-2 अन्वयेच्या दि. 04.05.2023 रोजीच्या शासन निदेशांनुसार खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता गुणवत्तेच्या आधारावर पात्र ठरणा-या महिला उमेदवारांना नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली असून सदर शासन निदेशांतील मुद्दा क्र. 4 नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(6) अ.जा. व अ.ज. प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागासप्रवर्गातील सर्व स्त्री/पुरुष उमेदवारांनी ते/त्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) सक्षम प्राधिका-याचे नवीनतम प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे. अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र नसल्यास उमेदवाराने ते मिळविण्यासाठी सक्षम प्राधिकरणास अर्ज सादर केल्याची पोच पावती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. मात्र कोणत्याही

परिस्थितीत कार्यकारी सहायक या पदावरील नियुक्तीवेळी सदर प्रमाणपत्र उमेदवाराजवळ नसल्यास, उमेदवाराचा सामाजिक/समांतर आरक्षणांतर्गत कार्यकारी सहाय्यक पदावरील नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही.

(7) दिव्यांग आरक्षाणांतर्गत अर्ज करु इच्छिणा-या कर्मचा-यांनी किमान 40% दिव्यांगत्व असल्याबाबतचे शासकीय सक्षम प्राधिका-यांनी दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. दिव्यांग शासन निर्णय क्र. दिव्यांग2019/प्र.क्र.200/दि.क.2 दि. 05.10.2021 अनुसार लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेसाठी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करुन देण्यात येतील. दिव्यांग प्रमाणपत्राबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने दि. 14.09.2018 च्या शासन निर्णयानुसार, दिव्यांगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

(8) अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व (मागासवर्गीय उमेदवारांसह) उमेदवारांचा अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/ उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांचा मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

(9) महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र.बीसीसी/2011/प्र.क.1064/2011/16-ब दि.12.12.2011 नुसार मागासवर्गीय उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत संबंधित जात वैधता पडताळणी समितीकडून प्राप्त केलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने नोंदणीकृत नोटरी प्रतिज्ञापत्र नियुक्तीवेळी सादर करणे बंधनकारक राहील. तसेच, उमेदवार ज्या जात प्रवर्गात मोडत आहे, त्या प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्याची जबाबदारी सर्वस्वी कर्मचा-याची राहील.

**(3) निम्नसंवर्गातील कर्मचा-यांमधून निवड पद्धतीने 'कार्यकारी सहायक' पदावर नियुक्तीकरीता विहित अर्हता पुढीलप्रमाणे आहेत :-**

3.1(i) उमेदवार मान्यताप्राप्त मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असावा.

आणि

3.1(ii) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा वाणिज्य, विज्ञान, कला, विधि किंवा तत्सम शाखांचा पदवीधर असावा.

3.2) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र वा तत्सम किंवा उच्च परीक्षा 100 गुणांचे मराठी व 100 गुणांचे इंग्रजी हे विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.

3.3) उमेदवाराकडे शासनाची इंग्रजी व मराठी टंकलेखनाची प्रत्येकी किमान 30 शब्द प्रति मिनिट वेगाची परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र असावे.

3.4(i) उमेदवाराजवळ एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा शासन निर्णय क्र.मातंस2012/प्र.क्र.277/39 दि.04.02.2013 आणि शासन पुरकपत्र क्र. मातंस 2012/प्र.क्र.277/ 39 दि. 08.01.2018 तसेच शासन पुरकपत्र क्र. मातंस2012/प्र.क्र.277/39 दि.16.07.2018 मध्ये नमूद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचानलयाने यासंदर्भात यापुढे वेळोवेळी निर्गमित केलेल्या व बृहन्मुंबई महानगरपालिकेने अंमलात आणलेल्या परिपत्रकांमधील तरतूदी त्यांना लागू होतील.

3.4(ii) उमेदवाराला संगणकातील ऑपरेटिंग सिस्टम, वर्ड प्रोसेसिंग, स्प्रेडशिट, प्रेझेनटेशन, डेटाबेस सॉफ्टवेअर, ई-मेल आणि इंटरनेट इत्यादीविषयी उत्तम ज्ञान असावे.

तथापि, उमेदवाराजवळ उपरोक्त अर्हतेतील अनुक्रमांक 3.4(i) मध्ये नमूद केलेली संगणक विषयक अर्हता नसल्यास, नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाच्या आत सदर अर्हता प्राप्त करणे बंधनकारक राहील. **अन्यथा त्याला मूळ पदावर प्रत्यावर्तित करण्यात येईल.**

3.5) अनुभव :-

उमेदवाराचा महानगरपालिकेच्या कोणत्याही खात्यात निम्नसंवर्गातील पदावर मासिक वेतनावरील सेवाकाल 4 वर्षापेक्षा कमी नसावा.

3.6) गट 'ड' मधून 'कार्यकारी सहाय्यक' संवर्गात निवड करण्यासाठी वर नमूद केलेल्या अर्हतेसह महानगरपालिकेतर्फे घेण्यात येणारी विभागीय परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागेल, व लेखी परीक्षेतील गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड करण्यात येईल.

**(4) वयोमर्यादा :-**

बृहन्मुंबई महानगरपालिकेत निम्नसंवर्गात कार्यरत कर्मचा-यांना 'कार्यकारी सहाय्यक' संवर्गात नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादाची अट लागू नाही.

**(5) <u>निवडीचे निकष व कार्यपध्दती :-</u>**

निम्नसंवर्गातील कर्मचा-यांमधून निवडपद्धतीने भरण्यात येणा-या 'कार्यकारी सहाय्यक' (पूर्वीचे पदनाम 'लिपिक') या पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार विहित केलेली अर्हता व अटी/शर्ती धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांची बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षा संगणकावर घेण्यात येईल. सदर परीक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे बनविलेल्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांमधून विहित आरक्षणानुसार निवडयादी खालील निकषांप्रमाणे तयार करण्यात येईल.

**(अ)** निम्नसंवर्गातील कर्मचा-यांमधून निवड पध्दतीने भरण्यात येणा-या 'कार्यकारी सहाय्यक' या पदासाठी बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेच्या प्रश्नप्रत्रिकेचा दर्जा, पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील परंतु त्यापैकी मराठी व इंग्रजी या विषयांच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या(इ.12 वी) समान राहील व त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल.

| अ. क्र. | चाचणी | प्रश्न | गुण | 40% नुसार प्रत्येक विषयात उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक किमान गुणसंख्या | एकूण उत्तीर्ण गुणसंख्या | वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मराठी भाषा व व्याकरण | 25 | 50 | 20 | प्रत्येक विषयात किमान 40% गुण मिळणे आवश्यक. तथापि, **एकूण गुणांची बेरीज 45% असणे आवश्यक आहे.** | 100 मिनिटे |
| 2 | इंग्रजी भाषा व व्याकरण | 25 | 50 | 20 | | |
| 3 | सामान्य ज्ञान | 25 | 50 | 20 | | |
| 4 | बौध्दिक चाचणी | 25 | 50 | 20 | | |

- ★ सामान्य ज्ञान विषयाच्या प्रश्नपत्रिकेमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेशी तसेच इतर विषयाशी निगडीत प्रश्न अंर्तभूत असतील.
- ★ बौध्दिक चाचणी परीक्षेचे स्वरुप पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेनुसार असेल.
- ★ इंग्रजी भाषा व व्याकरण ही ऑनलाईन परीक्षा इंग्रजी भाषेतून व मराठी भाषा व व्याकरण, सामान्य ज्ञान, बौध्दिक चाचणी या ऑनलाईन परीक्षा मराठी भाषेतून घेण्यात येईल.
- ★ मौखिक चाचणी घेण्यात येणार नाही.

'कार्यकारी सहाय्यक' पदाची अर्हता धारण करणा-या पात्र उमेदवारांची बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परिक्षेमध्ये प्राप्त होणा-या एकूण गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडयादी तयार करण्यात येईल.'

(ब) उपरोक्त 'अ' चे परिगणन केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा अधिक उमेदवारांचे समान गुण झाल्यास, अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास धारण केलेल्या उच्च शैक्षणिक अर्हतेस प्राधान्यक्रम देण्यात येईल.

(क) उपरोक्त 'ब' नुसार क्रमवारी समान आल्यास उमेदवाराने उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याच्या दिनांकानुसार प्राधान्यक्रम देण्यात येईल.

(ड) उपरोक्त 'क' नुसार क्रमवारी समान आल्यास उमेदवाराचा अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास धारण करीत असलेल्या अनुभवाच्या कालावधीनुसार प्राधान्यक्रम देण्यात येईल.

(इ) उपरोक्त 'ड' नुसार क्रमवारी समान आल्यास उमेदवाराच्या वयानुसार प्राधान्यक्रम देण्यात येईल. (वयाने जेष्ठ असलेल्यांचा क्रम वरती लागेल)

(फ) वरील निकष लागूनही उमेदवारांचा गुणवत्ताक्रम समान येत असल्यास अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम त्यांच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार निश्चित करण्यात येईल.

उपरोक्त निवडीच्या निकषांनुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास निवडीचे निकष शिथिल करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना राहतील.

**(6) ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचना :-**

**1. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्विकारले जातील. इतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.**

**2. ऑनलाईन पध्दतीने करावयाचा अर्ज https://portal.mcgm.gov.in या पोर्टलवर 'उज्वल संधीकरीता – सर्व नोकरीच्या संधी' या टॅब मध्ये उपलब्ध असेल.**

**3. उमेदवाराने वर नमूद केलेल्या लिंकवर भेट देऊन परिपत्रकासोबत जोडलेलल्या 'HOW TO APPLY' मधील मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन अर्ज सादर करावा.**

**(7) ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी :-**

**दिनांक 27.05.2023 (00:00:01) ते दिनांक 16.06.2023(24:00:00)**

**(8) खात्यांतर्गत ऑनलाईन परीक्षा शुल्क :-**

1) खुला प्रवर्गाकरीता रु. 1000/- (रुपये एक हजार फक्त) (सर्व करासहित)

2) मागासप्रवर्गाकरीता रु. 900/- (रुपये नऊशे फक्त) (सर्व करासहित)

अ) परीक्षा शुल्क भरण्याकरीता ऑनलाईन सुविधा **(ONLINE MODE)** उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

आ) सदर परीक्षा शुल्क हे ना-परतावा राहील व ते कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.

**ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्याचा कालावधी :-**

**दिनांक 27.05.2023 (00:00:01) ते दिनांक 16.06.2023(24:00:00)**

**उमेदवाराने संपूर्ण अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रिंट काढून स्वतःजवळ ठेवावी.**

**उमेदवारांना अर्ज भरतेवेळी येणा-या शंकांचे निरसन करण्यासाठी उमेदवारांच्या मार्गदर्शनार्थ पुढीलप्रमाणे लिंक https://cgrs.ibps.in उपलब्ध असेल.**

**(९) दिव्यांग उमेदवारांकरीता सूचना :-**

**लेखनिक वापरणा-या दिव्यांग व्यक्तींकरिता मार्गदर्शक सूचना :-**

अ) दिव्यांग उमेदवार ज्यांच्या लेखनाच्या गतीवर काही कारणास्तव कायमस्वरुपी परिणाम झाल्याने लेखनिकाच्या मदतीची आवश्यकता आहे, अशा उमेदवारांनी सुरवातीस ऑनलाईन अर्जामध्ये ते स्वत: लेखनिकाची व्यवस्था करणार आहेत किंवा महानगरपालिकेने त्यांना लेखनिक उपलब्ध करुन द्यावयाचा आहे याबाबत नोंद करणे बंधनकारक आहे.

ब) उमेदवाराने परीक्षेदरम्यान स्वत:चा लेखनिक वापरल्यास तो स्व:खर्चाने वापरावयाचा आहे.

क) तसेच शासन निर्णय क्र. दिव्यांग 2019/प्र.क्र.200/दि.क. 2 दि. 05.10.2021 मधील निर्देशांचे संबंधित उमेदवारांनी तंतोतंत पालन करणे बंधनकारक आहे. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांचा संकेतांक 202110051504462322 असा आहे. सदर शासन निर्णयासोबत संलग्न करण्यात आलेल्या APPENDIX- I व APPENDIX- II ची पुर्तता संबंधित उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतेवेळी पुर्ण करावयाची आहे.

ड) उमेदवार परिक्षेदरम्यान स्वत:चा लेखनिक वापरत असेल अशावेळी उपरोक्त शासन निर्णयात नमूद केलेल्या सर्व विहीत पात्रता निकषांची पुर्तता केली आहे असे स्वत: उमेदवार आणि लेखनिक दोघांनीही हमी पत्र देणे बंधनकारक आहे. पुढे जर असे निदर्शनास आले की त्याने/तिने वरील कोणतेही पात्रता निकष पूर्ण केले नाहीत किंवा दडविले आहेत, अशा उमेदवारांच्या निकालाचा विचार न करता त्यांचा अर्ज रद्द केला जाईल.

**भरपाई वेळ :-**

शासन निर्णय क्र. दिव्यांग 2019/प्र.क्र.200/दि.क.2 दि. 05.10.2021 मधील निर्देशानुसार, दिव्यांगत्व असलेले उमेदवार प्रती तासासाठी अतिरिक्त वीस मिनिटांच्या भरपाई वेळेस पात्र असतील.

**दृष्टीहीन उमेदवारांसाठी मार्गदर्शक तत्वे :-**

अ) दृष्टीहीन उमेदवार (किमान 40%) परीक्षेदरम्यान मॅग्निफाइड फॉन्ट्चा पर्याय निवडू शकतात आणि असे सर्व उमेदवार प्रती तास वीस मिनिटे भरपाई वेळेस पात्र असतील.

ब) तथापि, ज्या उमेदवारांनी परीक्षेदरम्यान लेखनिक वापरण्याची मुभा घेतली आहे, अशा उमेदवारांना परीक्षेदरम्यान मॅग्निफाइड फॉन्ट निवडण्याचा पर्याय उपलब्ध असणार नाही. वरील मार्गदर्शक तत्वामध्ये GOI Guidelines/Clarifications मध्ये होणा-या सुधारणांनुसार वेळोवेळी बदल संभवतात.

**शासकीय सक्षम प्राधिका-यांकडून किमान 40% दिव्यांगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व दिव्यांग प्रवर्गांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना परिपत्रक क्र. साप्रवि/एफजीआर/36 दि. 21.12.2009 अनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे पाठविले जाईल व वैद्यकीय मंडळाच्या निर्णयाच्या अनुषंगाने नियुक्तीची कार्यवाही करण्यात येईल.**

**(10) परीक्षा केंद्रांविषयी नियमावली :-**

अ) संबंधित प्रवेश पत्रामध्ये दिलेल्या ठिकाणी ऑनलाईन परीक्षा घेतली जाईल.

ब) परीक्षेसाठी प्रवेश पत्रामध्ये देण्यात आलेले परीक्षा केंद्र/स्थळ/तारीख/सत्र यामध्ये बदल करण्याबाबतची विनंती मान्य करता येणार नाही.

क) तथापि, कोणत्याही प्रकारच्या प्रशासकिय व्यवहार्यतेकरीता कोणतेही परीक्षा केंद्र/स्थळ/तारीख/सत्र यामध्ये बदल करण्याची जबाबदारी परीक्षा आयोजक संस्थेची राहील.

ड) उमेदवार स्वत:च्या जोखमीवर परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी उपस्थित राहतील. कोणत्याही स्वरुपातील इजा किंवा नुकसानीसाठी परीक्षा आयोजक संस्था जबाबदार राहणार नाही.

इ) परीक्षेसाठी प्रवेश पत्रामध्ये नमूद केलेल्या वेळेनंतर परीक्षा केंद्रावर उपस्थित होणा-या उमेदवारास परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येणार नाही. प्रवेश पत्रामध्ये नमूद केलेली रीपोर्टींग वेळ ही परीक्षा सुरु होण्यापूर्वीची आहे. परीक्षेचा कालावधी 100 मिनिटांचा असला तरी, उमेदवारांना विविध प्राथमिक औपचारीकता पुर्ण करण्यासाठी जसे की विविध कागदपत्रांची पडताळणी, बायोमेट्रिक इत्यादी बाबींच्या पुर्ततेसाठी परीक्षा कालावधीच्या सुमारे 1 तास आधी परीक्षा स्थळी उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

**(11) ओळख पडताळणी** :-

परीक्षा हॉलमध्ये परीक्षेसाठी उपस्थित होत असताना, मूळ प्रवेश पत्रासह बृहन्मुंबई महानगरपालिकेचे मूळ ओळखपत्र (त्याच्या छायाप्रतीसह) ओळखीचा पुरावा म्हणून सोबत बाळगणे आवश्यक आहे. तसेच पर्यवेक्षकाने मागणी केल्यावर पडताळणीसाठी पर्यवेक्षकास त्वरीत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मूळ कॉल लेटरवरील माहिती, उपस्थिती अहवाल व सादर करण्यात आलेल्या ओळखीच्या पुराव्यांची सत्यता पर्यवेक्षकांकडून तपासण्यात येईल. उमेदवाराच्या ओळखीबाबत शंका उपस्थित झाल्यास त्याला/तिला परीक्षेस उपस्थित राहण्याची परवानगी नाकारण्यात येईल.

**टीप :-** परीक्षेस उपस्थित राहताना उमेदवारास बृहन्मुंबई महानगरपालिकेचे मूळ ओळखपत्र(त्याच्या छायाप्रतीसह) पुरावा म्हणून मूळ प्रवेश पत्रासह सादर करावे लागेल. त्याशिवाय त्यांना परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येणार नाही. उमेदवारांनी ही बाब लक्षात घ्यावी की त्यांच्या प्रवेश पत्रावर दिसणारे नाव (अर्ज नोंदणी प्रक्रिये दरम्यान दिलेले नाव) हे फोटो ओळखीच्या पुराव्याशी तंतोतंत जुळले पाहीजे. नाव/आडनाव/मधले नाव बदललेल्या विवाहित महिलांनी याची विशेष नोंद घ्यावी. ज्या उमेदवारांनी त्यांचे नाव बदलले असेल, त्यांनी मूळ राजपत्र अधिसूचना/मूळ विवाह प्रमाणपत्र त्याच्या छायाप्रतीसह सादर केल्यावर परीक्षेस बसण्यास त्यांना परवानगी देण्यात येईल.

**(12) सर्वसाधारण अटी :-**

1. सदर खात्यांतर्गत भरती प्रक्रियेत अंतिम निर्णय घेण्याचे व प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव सदर खात्यांतर्गत भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा. महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील.

   सदर खात्यांतर्गत भरती प्रक्रियेमध्ये एकूण रिक्त पदांच्या संख्येत संभाव्य रिक्त पदे देखील अंतर्भूत असल्याने उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील. तथापि, तयार करण्यात आलेली निवड यादी कोणत्याही वेळेस पूर्व सूचना न देता रद्द करण्याचे अथवा निवड यादीचा कालावधी वाढविण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना आहे. यास्तव, उमेदवाराचे नाव निवड यादीत समाविष्ट झाले तरीही सदर पदावर त्याचा नियुक्ती करीता कोणताही अधिकार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

2. निम्नसंवर्गातील कर्मचारी विहित अर्हता व अटी/शर्ती पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच, त्याची विहित अर्हता व अटी/शर्ती विहित कालावधीत पूर्ण करणेसापेक्ष कार्यकारी सहाय्यक पदावर नेमणूक झाली असल्यास, त्यांने सदर अटींची पूर्तता विहित कालावधीत न केल्यास त्याला त्याच्या मूळ पदावर प्रत्यावर्त करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

3. इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरिता विचार केला जाणार नाही.

4. उमेदवाराचा ई-मेल आयडी आणि भ्रमणध्वनी क्रमांक सुस्पष्ट व पूर्ण असावा.

5. उमेदवाराने खालील नमूद शैक्षणिक प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे यांच्या मूळ प्रती तसेच त्यांच्या छायांकित प्रती संबंधित कार्यालयातील सक्षम अधिका-यांकडून साक्षांकित करुन घेऊन तपासणीसाठी नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

**अ.** उमेदवाराचा शाळा सोडल्याचा दाखला, जन्मदाखला, शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्र, पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याबाबत गुणपत्रिका (सर्व सेमीस्टर/वर्ष यांच्या गुणपत्रिका) व प्रमाणपत्र, व्यावसायिक प्रमाणपत्रे(शासनाची मराठी व इंग्रजी टंकलेखनाची प्रमाणपत्रे, एम.एस.सी.आय.टी. प्रमाणपत्र किंवा शासन निर्णय क्र.मातंस2012/प्र.क्र.277/39 दि.04.02.2013 आणि शासन पुरकपत्र क्र. मातंस2012/प्र.क्र.277/39 दि. 08.01.2018 तसेच शासन पुरकपत्र क्र. मातंस2012/प्र.क्र.277/39 दि.16.07.2018 मध्ये नमूद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र), सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र यांच्या साक्षांकित छायांकित प्रती.

**ब.** विवाहित महिला उमेदवाराने विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करावे. तसेच सदर प्रमाणपत्र नसल्यास, विवाहित महिला विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात. तथापि, कार्यकारी सहाय्यक पदावर नियुक्तीपूर्वी पडताळणीच्या वेळेस सदर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**क.** अ.जा. व अ.ज. प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागासप्रवर्गातील तसेच आर्थिक दृष्ट्या दूर्बल घटक (ईडब्ल्युएस) प्रवर्गातील उमेदवाराने ते/त्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) सक्षम प्राधिका-याचे नवीनतम प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**ड.** अ.जा. व अ.ज. प्रवर्ग वगळता इतर सर्व मागासप्रवर्गाच्या सर्व स्त्री/पुरुष उमेदवारांनी ते/त्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) सक्षम प्राधिका-याचे नवीनतम प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे. मात्र कोणत्याही परिस्थितीत नियुक्तीच्या वेळी सदर प्रमाणपत्र नसल्यास उमेदवाराचा नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही.

**इ.** महिला समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या उमेदवारांकरीता क्र. महिआ2023/प्र.क्र.123/कार्या-2 अन्वयेच्या दि. 04.05.2023 रोजीच्या शासन निदेशांनुसार खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता गुणवत्तेच्या आधारावर पात्र ठरणा-या महिला उमेदवारांना नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली असून सदर शासन निदेशांतील मुद्दा क्र. 4 नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि, सदर आरक्षणांतर्गत निवड झालेल्या महिला कर्मचा-याच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याच्या (नॉन

क्रिमीलेअर) प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी संबंधित प्राधिकरणाकडून केल्यानंतर नियुक्ती करण्यात येईल.

6. परिपत्रक क्र. एमबीसी/7100 दि. 31.01.2012 सोबतच्या महाराष्ट्र शासनच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेला शासन निर्णय क्र.बीसीसी/2011/प्रक्र.1064/2011/16ब दि.12.12.2011 नुसार मागासवर्गीय उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून पडताळणी करुन घेणे बंधनकारक आहे. परंतु जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर उमेदवारास दिलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल व त्याला त्याच्या मूळ पदावर प्रत्यावर्त करण्यात येईल.

7. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र.राआधो-4019/प्र.क्र.31/16-अ दि.12.02.2019 आणि शासन निर्णय क्र.राआधो-4019/प्र.क्र.31/16-अ दि.31.05.2021 मधील निर्देशानुसार आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाची (इ.डब्ल्यु.एस.) रिक्त पदे भरण्यात येतील.

8. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणतीही प्राथमिक चौकशी किंवा खात्यांतर्गत चौकशी प्रलंबित नाही आणि/किंवा प्रस्ताविण्यात आलेली नाही. तसेच, कोणतेही न्यायालयीन किंवा फौजदारी प्रकरण प्रलंबित नाही. त्याचप्रमाणे, उमेदवार शिक्षाधीन नसल्याचे खाते प्रमुखांचे चौकशी प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

9. परिपत्रक क्र.एमपीएम/9535 दि.20.06.2001 अनुसार सदर भरती प्रक्रियेची निवडसूची दोन वर्षासाठी किंवा नवीन भरतीप्रक्रियेकरिता परिपत्रक निर्गमित करण्यात येईल तो दिनांक या दोन्हीपैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत विधिग्राह्य ठरेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

10. परिपत्रक क्र. एमपीएम/दोन/7692 दि. 01.11.2012 मधील निर्देशानुसार कार्यकारी सहायक(पूर्वीचे पदनाम : लिपिक) पदी नियुक्ती होणा-या कर्मचा-यांचा मूळ पदावरील धारणाधिकार कर्मचारी कार्यकारी सहायक पदावर नियुक्त झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षापर्यंत राहील.

11. उपरोक्त निकषांनुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास निवडीचे निकष शिथिल करण्याचे अधिकार मान. महानगरपालिका आयुक्त यांना राहतील.

12. वरीलप्रमाणे पात्र ठरलेल्या उमेदवारांची एकत्रित सामायिक गुणवतायादी तयार करुन सदर

गुणवत्तायादीमधील उच्च गुणवत्ताधारक मागासवर्गीय उमेदवारांचा खुला प्रवर्गाच्या पदाकरिता विचार करण्यात येईल.

13. उमेदवाराची 'कार्यकारी सहाय्यक' पदावरील नेमणूक प्रारंभी तीन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीकरिता असेल. परिविक्षाधीन कालावधीत नैमित्तिक रजा वगळून अन्य कोणत्याही कारणाने रजा घेतल्यास/ रजेविना अनुपस्थितीत राहिल्यास त्या कालावधीकरिता परिविक्षाधीन कालावधी पुढे वाढविण्यात येईल. तसेच या कालावधीत त्यांची वर्तणूक, उपस्थिती व सेवा असमाधनकारक आढळल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांना त्यांच्या मूळ पदावर प्रत्यावर्त करण्यात येईल.

14. निम्नसंवर्गातील कर्मचा-यांमधून निवड पद्धतीने कार्यकारी सहाय्यक पदाच्या निवडीसाठी पात्र उमेदवारांची बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परिक्षेमध्ये प्राप्त होणा-या एकूण गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार व सामाजिक व समांतर आरक्षणानुसार अंतिम निवडयादी तयार करण्यात येईल.

15. सदर परिक्षेत उत्तीर्ण उमेदवारांची निवडीच्या निकषांनुसार, गुणवत्ता, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार अंतिम निवडयादी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ftp://hr.mcgm.gov.in/Circular/GAD/ChPO/MPR/2023 या इंट्रानेटवर प्रसिद्ध करण्यात येईल. सदर निवडयादी उमेदवाराच्या मूळ शैक्षणिक व इतर अनुषांगिक प्रमाणपत्राच्या पडताळणीसापेक्ष असेल. उमेदवाराने आवश्यक प्रमाणपत्रे विहित कालावधीत पडताळणीकरिता सादर न केल्यास त्याचे नाव निवडयादीतून रद्द करण्यात येईल.

16. उमेदवारांची नियुक्ती गुणवत्ता, सामाजिक व समांतर आरक्षण, रिक्त पदांची उपलब्धता, निवडयादीची विधीग्राह्यता, इ. बाबी विचारात घेऊन करण्यात येईल.

17. सदर भरती प्रक्रियेअंतर्गत कार्यकारी सहायक(पूर्वीचे पदनाम : लिपिक) पदावरील नियुक्त्या या मा. उच्च न्यायालय, मुंबई व मा. औद्योगिक न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित असलेल्या याचिका/तक्रारींच्या अंतिम निर्णयाच्या आधीन राहून करण्यात येतील.

18. 'कार्यकारी सहायक' संवर्गाच्या रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे निवडयादी तयार करुन आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील. तथापि भरती प्रक्रिया तसेच निवडयादी कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.

19. काही अपरिहार्य कारणास्तव ऑनलाईन परीक्षेच्या तारखांमध्ये बदल करावा लागल्यास, त्याबाबतची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ftp://hr.mcgm.gov.in/Circular/GAD/ChPO/MPR/2023 या इंट्रानेटवर प्रसिद्ध करण्यात येईल.

20. या भरतीप्रक्रिया संदर्भात वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती व सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वरील संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सदर संकेतस्थळ उमेदवारांनी वेळोवेळी पहावे.

21. जर एखाद्या उमेदवाराने नियुक्तीवेळी कार्यकारी सहाय्यक पद स्वीकारण्यास कोणत्याही कारणाने नकार दिल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही कारणास्तव सदर पदावर काम करण्यास नकार दिल्यास, त्याची सदर पदावरील निवड रद्दबातल होईल.

22. परिपत्रक क्र. एमबीसी/6257 दि. 20.01.2020 सोबतच्या शासन निर्णयातील निर्देशानुसार ज्या कर्मचा-यांची सेवा अधिसंख्य पदावर वर्ग झाली आहे किंवा प्रस्तावित आहे अशा कर्मचा-यांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**(13) विशेष सूचना :-**

**1.** परिपत्रक क्र.एमपीआर/9924 दि.01.03.2014 व क्र.एमपीआर/4859 दि.01.01.2015 अन्वये अर्ज मागवून निम्नसंवर्गातील कर्मचा-यांना लिपिक संवर्गात नियुक्तीकरीता दि.11.04.2015 रोजी घेण्यात आलेली खात्यांतर्गत ऑनलाईन परीक्षा उत्तीर्ण झालेले, तसेच यापूर्वी देखिल निम्नसंवर्गातून लिपिक संवर्गात नियुक्तीकरीता घेण्यात आलेल्या खात्यांतर्गत परिक्षेत उत्तीर्ण झालेले तथापि, पदसंख्येअभावी लिपिक संवर्गात निवड न झालेल्या कर्मचा-यांनी या परिपत्रकाद्वारे पुन्हा नव्याने अर्ज करून प्रस्तावित ऑनलाईन परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

अ) सदर परिपत्रक बृहन्मंबई महानगरपालिकेच्या ftp://hr.mcgm.gov.in/Circular/GAD/ChPO/MPR/2023 या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

आ) उमेदवाराची जात मागास प्रवर्गात मोडत असल्यास, मागास प्रवर्गासाठी आरक्षणाचा फायदा घेण्याकरीता उमेदवाराने त्याच्या नियुक्ती दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असल्याबाबतचे **प्रतिज्ञापत्र** नियुक्तीवेळेस सादर करणे आवश्यक आहे.

**2**. परीक्षेच्या व्यवस्थापनामध्ये काही समस्या उद्भवल्यास त्याचा परिणाम ऑनलाइन परीक्षेवर किंवा निकालावर होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. अशा परिस्थितीमध्ये परीक्षेस होणारा विलंब, उमेदवारांवर होणारा परिणाम, तसेच उमेदवारांना पुन्हा परीक्षा देण्यास लागू नये यासह सर्व बाबींचे निराकरण करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न परीक्षा आयोजित करणा-या संस्थेद्वारा करण्यात येईल. तथापि, अशा परिस्थितीमध्ये जे उमेदवार सहकार्य करण्यास इच्छुक नसतील अशा उमेदवारांना भरती प्रक्रियेमधून पुर्णत: वगळण्यात येईल.

अ) भरती प्रक्रियेशी संबंधित सर्व बाबींबाबत महानगरपालिकेचा निर्णय हा अंतिम राहील. तसेच तो सर्व उमेदवारांना बंधनकारक राहील. याबाबत केल्या जाणा-या विचारणा व पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

ब) ऑनलाईन व लेखी परीक्षेदरम्यान परीक्षा केंद्रांची क्षमता कमी असल्यास किंवा काही तांत्रिक समस्या

निर्माण झाल्यास एकापेक्षा जास्त सत्रामध्ये परीक्षा घेतल्या जातील.

क) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती दिली किंवा भरती प्रक्रियेचे उल्लंघन केल्याची बाब निदर्शनास आल्यास त्याला/तिला निवड प्रक्रिये दरम्यान अपात्र ठरविण्यात येऊन भविष्यात संस्थेच्या कोणत्याही भरती प्रक्रियेस उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही. तसेच सदर बाब भरती प्रक्रियेनंतर निदर्शनास आल्यास पुर्वलक्षी प्रभावाने उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

उपरोक्त परिपत्रकाचे संपुर्ण अवलोकन करुन उमेदवारांनी पुढील लिंक उघडून अर्ज भरण्याची प्रक्रिया पुर्ण करावी. **https://ibpsonline.ibps.in/bmceaapr23/**

**निम्नसंवर्गातून निवडपध्दतीने 'कार्यकारी सहाय्यक' या पदाची खात्यांतर्गत ऑनलाईन परीक्षा जूलै/ऑगस्ट 2023 मध्ये घेण्याचे आयोजित केले आहे. तथापि, प्रत्यक्ष परीक्षेचा दिनांक, स्थळ आणि व्यवस्था इत्यादी बाबी यथावकाश कळविण्यात येतील.**

| | | |
|---|---|---|
| सही/-08.03.2023<br>सह प्रमुख कर्मचारी अधिकारी (आस्था.) | सही/-15.03.2023<br>प्रमुख कर्मचारी अधिकारी | सही/-15.03.2023<br>सह आयुक्त (सामान्य प्रशासन) |
| सही/-17.03.2023<br>अतिरिक्त आयुक्त (शहर) | सही/-20.03.2023<br>मान.महानगरपालिका आयुक्त | |

प्रत : ….......................................................... यांना माहितीकरीता व पुढील कार्यवाहीकरीता अग्रेषित.

सही/- 24.05.2023
प्रमुख कर्मचारी अधिकारी

# HOW TO APPLY

## (Guidelines for applying online on service provider' portal)

**DETAILED GUIDELINES / PROCEDURES FOR :-**

A. **APPLICATION REGISTRATION**

B. **PAYMENT OF FEES**

C. **DOCUMENT SCAN AND UPLOAD**

**Candidates can apply ONLINE only from 27.05.2023 to 16.06.2023 and no other mode of application will be accepted.**

**IMPORTANT POINTS TO BE NOTED BEFORE REGISTRATION**

Before applying online, candidates should –

**(i)** **scan their :**

- **Photograph (4.5cm × 3.5cm)**
- **signature (with black ink)**
- **Left thumb impression (on white paper with black or blue ink)**
- **A hand written declaration (on a white paper with black ink) (text given below)**

  **Ensuring that the all these scanned documents adhere to the required specifications as given in Point (C) given below in the guidelines.**

**(ii)** **Signature in CAPITAL LETTERS will NOT be accepted.**

**(iii)** **The left thumb impression should be properly scanned and not smudged. (**If a candidate is not having left thumb, he/she may use his/her right thumb for applying.)

**(iv)** **The text for the hand written declaration is as follows –**
***" I, _____(Name of the candidate), hereby declare that all the information submitted by me in the application form is correct, true and valid. I will present the supporting documents as and when required."***

**(v)** **The above mentioned hand written declaration has to be in the candidate's hand writing and in English only. It it is written and uploaded be anybody else or in any other language, the application will be considered as invalid.** (In case of Visually Impaired candidates who cannot write may get the text of declaration typed and put their left thumb impression below the typed declaration and upload the document as per specifications.)

**(vi)** **Keep the necessary details/documents ready to make** Online Payment **of the requisite application fee/ intimation charges.**

(vii) **Have a valid personal email ID and mobile no., which should be kept active till the completion of this Recruitment Process. BMC may send intimation to download call letters for the Interview etc. through the registered e-mail ID. In case a candidate does not have a valid personal e-mail ID, he/she should create his/her new e-mail ID and mobile no. before applying on-line and must maintain that email account and mobile number.**

**EXAMINATION FEES (NON REFUNDABLE) PAYMENT OF FEE ONLINE: 27.05.2023 to 16.06.2023.**

Bank Transaction charges for Online Payment of examination fees will have to be borne by the candidate.

**A. <u>Application Registration</u>**

1. Candidates to go to the BMC'S website - Click on the option " Apply Online" which will open a new screen.

2. To register application, choose the tab "Click here for New Registration" and enter Name, Contact details and Email-id. A Provisional Registration Number and Password will be generated by the system and displayed on the screen. Candidate should note down the Provisional Registration Number and Password. An Email & SMS indicating the Provisional Registration number and Password will also be sent. They can reopen the saved data using Provisional registration number and password and edit the particulars, if needed.

3. In case the candidate is unable to complete the application form in one go, he / she can save the data already entered by choosing "SAVE AND NEXT" tab. Prior to submission of the online application candidates are advised to use the "SAVE AND NEXT" facility to verify the details in the online application form and modify the same if required. Visually Impaired candidates should fill the application form carefully and verify/ get the details verified to ensure that the same are correct prior to final submission.

4. Candidates are advised to carefully fill and verify the details filled in the online application themselves as no change will be possible/ entertained after clicking the COMPLETE REGISTRATION BUTTON.

5. The Name of the candidate or his /her Father/ Husband etc. should be spelt correctly in the application as it appears in the Certificates/ Mark sheets/Identity proof. Any change/alteration found may disqualify the candidature.

6. Validate your details and Save your application by clicking the 'Validate your details' and 'Save & Next' button.

7. Candidates can proceed to upload Photo & Signature as per the specifications given in the Guidelines for Scanning and Upload of Photograph and Signature detailed under Point (C).

8. Candidates can proceed to fill other details of the Application Form.

9. Click on the Preview Tab to preview and verify the entire application form before COMPLETE REGISTRATION.

10. Modify details, if required, and click on 'COMPLETE REGISTRATION' ONLY' after verifying and ensuring that the photograph, signature uploaded and other details filled by you are correct.

11. Click on 'Payment' Tab and proceed for payment.

12. Click on 'Submit' button.

**B. Payment of Fees**

**Candidates to make payment of Examination Fees through ONLINE Mode only**.

1. The application form is integrated with the payment gateway and the payment process can be completed by following the instructions.

2. The payment can be made by using Debit Cards (RuPay/Visa/MasterCard/Maestro), Credit Cards, Internet Banking, IMPS, Cash Cards/ Mobile Wallets.

3. After submitting your payment information in the online application form, PLEASE WAIT FOR THE INTIMATION FROM THE SERVER. DO NOT PRESS BACK OR REFRESH BUTTON IN ORDER TO AVOID DOUBLE CHARGE.

4. On successful completion of the transaction, an e-Receipt will be generated.

5. Non-generation of 'E-Receipt' indicates PAYMENT FAILURE. On failure of payment, Candidates are advised to login again using their Provisional Registration Number and Password and repeat the process of payment.

6. Candidates are required to take a printout of the e-Receipt and online Application Form containing fee details. Please note that if the same cannot be generated, online transaction may not have been successful.

7. For Credit Card users: All charges are listed in Indian Rupee. If you use a non-Indian credit card, your bank will convert to your local currency based on prevailing exchange rates.

8. To ensure the security of your data, please close the browser window once your transaction is completed.

9. **There is facility to print application form containing fee details after payment of fees.**

**Please note that all the particulars mentioned in the online application including Name of the Candidate, Category, Date of Birth, Address, Mobile Number, Email ID, venue of interview etc. will be considered as final and no change/modifications will be allowed after submission of the online application form. Candidates are hence advised to fill in the online application form with the utmost care as no correspondence regarding change of details will be entertained. BMC will not be held responsible for any consequences arising out of furnishing of incorrect and incomplete details in the application or omission to provide the required details in the application form.**

**An email/ SMS intimation with the Registration Number and Password generated on successful registration of the application will be sent to the candidate’s email ID/ Mobile Number specified in the online application form as a system generated acknowledgement. If candidates do not receive the email and SMS intimations at the email ID/ Mobile number specified by them, they may consider that their online application has not been successfully registered.**

**An online application which is incomplete in any respect such as without proper passport size photograph & signature uploaded in the online application form/ unsuccessful fee /intimation charges payment will not be considered as valid.**

**Candidates are advised in their own interest to apply on-line much before the closing date and not to wait till the last date for depositing the fee / intimation charges to avoid the possibility of disconnection/ inability/ failure to log on to the official BMC website on account of heavy load on internet/website jam.**

**BMC does not assume any responsibility for the candidates not being able to submit their applications within the last date on account of the aforesaid reasons or for any other reason beyond the control of the BMC.**

**Please note that the above procedure is the only valid procedure for submitting application. No other mode of application or incomplete steps would be accepted and such applications would be rejected.**

**Any information submitted by an applicant in his/ her application shall be binding on the candidate personally and he/she shall be liable for prosecution/ civil consequences in case the information/ details furnished by him/ her are found to be false at a later stage.**

### C. Guidelines for scanning and Upload of Documents

Before applying online a candidate will be required to have a scanned (digital) image of his/her photograph, signature, left thumb impression and the hand written declaration as per the specifications given below.

Photograph Image (4.5cm X 3.5cm):

- Photograph must be a recent passport style colour picture.
- Make sure that the picture is in colour, taken against a light-coloured, preferably white, background.
- Look straight at the camera with a relaxed face
- If the picture is taken on a sunny day, have the sun behind you, or place yourself in the shade, so that you are not squinting and there are no harsh shadows.
- If you have to use flash, ensure there's no "red-eye".
- If you wear glasses make sure that there are no reflections and your eyes can be clearly seen.
- Caps, hats and dark glasses are not acceptable. Religious headwear is allowed but it must not cover your face.
- Dimensions 200 x 230 pixels (preferred).
- Size of file should be between 20 kb–50 kb.
- Ensure that the size of the scanned image is not more than 50kb. If the size of the file is more than 50 kb, then adjust the settings of the scanner such as the DPI resolution, no. of colours etc., during the process of scanning.

Signature, left thumb impression and hand-written declaration Image:

- The applicant has to sign on white paper with Black Ink pen.
  - Dimensions 140 x 60 pixels (preferred)
  - Size of file should be between 10kb – 20kb.Ensure that the size of the scanned image is not more than 20kb
- The applicant has to put his left thumb impression on a white paper with black or blue ink.
  - File type: jpg / jpeg
  - Dimensions: 240 x 240 pixels in 200 DPI (Preferred for required quality) i.e 3 cm * 3 cm (Width * Height)
  - File Size: 20 KB – 50 KB
- The applicant has to write the declaration in English clearly on a white paper with black ink.
  - File type: jpg / jpeg
  - Dimensions: 800 x 400 pixels in 200 DPI (Preferred for required quality) i.e 10 cm * 5 cm (Width * Height)
  - File Size: 50 KB – 100 KB
- The signature, left thumb impression and the hand written declaration should be of the applicant and not by any other person.

- If the Applicant's signature on the attendance sheet or Call letter, signed at the time of the examination, does not match the signature uploaded, the applicant will be disqualified.
- Signature / Hand written declaration in CAPITAL LETTERS shall NOT be accepted.

Scanning the documents:

- Set the scanner resolution to a minimum of 200 dpi (dots per inch)
- Set Colour to True Colour
- File Size as specified above
- Crop the image in the scanner to the edge of the photograph/signature/ left thumb impression / hand written declaration, then use the upload editor to crop the image to the final size (as specified above).
- The image file should be JPG or JPEG format. An example file name is: image01.jpg or image01.jpeg. Image dimensions can be checked by listing the folder files or moving the mouse over the file image icon.
- Candidates using MS Windows/MSOffice can easily obtain documents in .jpeg format by using MS Paint or MSOffice Picture Manager. Scanned documents in any format can be saved in .jpg / .jpeg format by using 'Save As' option in the File menu. Size can be adjusted by using crop and then resize option.

Procedure for uploading the documents:

- While filling in the Online Application Form the candidate will be provided with separate links for uploading Photograph, signature, left thumb impression and hand written declaration
- Click on the respective link "Upload Photograph / signature / Upload left thumb impression / hand written declaration"
- Browse and Select the location where the Scanned Photograph / signature / left thumb impression / hand written declaration file has been saved.
- Select the file by clicking on it
- Click the 'Open/Upload'
- If the file size and format are not as prescribed, an error message will be displayed.
- Preview of the uploaded image will help to see the quality of the image. In case of unclear / smudged, the same may be re-uploaded to the expected clarity /quality.

Your Online Application will not be registered unless you upload your Photograph, signature, left thumb impression and hand written declaration as specified.

Note:

(1) In case the face in the photograph or signature or left thumb impression or the hand written declaration is unclear / smudged the candidate's application may be rejected.

(2) After uploading the Photograph / signature / left thumb impression / hand written declaration in the online application form candidates should check that the images are clear and have been uploaded correctly. In case the photograph or signature or left thumb impression or the hand written declaration is not prominently visible, the candidate may edit his/ her application and re-upload his/ her photograph or signature or left thumb impression or the hand written declaration, prior to submitting the form.

(3) Candidate should also ensure that photo is uploaded at the place of photo and signature at the place of signature. If photo in place of photo and signature in place of signature is not uploaded properly, candidate will not be allowed to appear for the exam.

(4) Candidate must ensure that Photo to be uploaded is of required size and the face should be clearly visible.

(5) If the photo is not uploaded at the place of Photo Admission for Examination will be rejected/denied. Candidate him/herself will be responsible for the same.
(6) Candidates should ensure that the signature uploaded is clearly visible
(7) After registering online candidates are advised to take a printout of their system generated online application forms.

**Procedure for uploading the documents**

- While filling in the Online Application Form the candidate will be provided with separate links for uploading left thumb impression and hand written declaration
- Click on the respective link "Upload left thumb impression / hand written declaration"
- Browse and Select the location where the Scanned left thumb impression / hand written declaration file has been saved.
- Select the file by clicking on it
- Click the 'Open/Upload' button Your Online Application will not be registered unless you upload your Left thumb impression and hand written declaration as specified.
- If the file size and format are not as prescribed, an error message will be displayed.
- Preview of the uploaded image will help to see the quality of the image. In case of unclear / smudged, the same may be re-uploaded to the expected clarity /quality.

**Note:**

(1) In case the left thumb impression or the hand written declaration is unclear / smudged the candidate's application may be rejected.
(2) After uploading the left thumb impression / hand written declaration in the online application form candidates should check that the images are clear and have been uploaded correctly. In case the left thumb impression or the hand written declaration is not prominently visible, the candidate may edit his/ her application and re-upload his/ her thumb impression / hand written declaration, prior to submitting the form.
(3) After registering online candidates are advised to take a printout of their system generated online application forms.

.ACTION AGAINST CANDIDATES FOUND GUILTY OF MISCONDUCT/ USE OF UNFAIR MEANS

Candidates are advised in their own interest that they should not furnish any particulars that are false, tampered with or fabricated and should not suppress any material information while submitting online application. At the time of examination, interview or in a subsequent selection procedure, if a candidate is (or has been ) found guilty of –

(i) Using unfair means or
(ii) Impersonating or procuring impersonation by any person or
(iii) misbehaving in the examination/ interview hall or disclosing, publishing, reproducing, transmitting, storing or facilitating transmission and storage of contents of the test(s) or any information therein in whole or part thereof in any form or by any means, verbal or written, electronically or mechanically for any purpose or
(iv) Resorting to any irregular or improper means in connection with his/ her candidature or
(v) Obtaining support for his/ her candidature by unfair means, or
(vi) Carrying mobile phones or similar electronic devices of communication in the examination/ interview hall, such a candidate may, in addition to rendering himself/ herself liable to criminal prosecution, be liable :
    (a) To be disqualified from the examination for which he/ she is a candidate
    (b) To be debarred either permanently or for a specified period from any examination conducted by BMC